पुण्य नगरी

# श्री रवळनाथच्या सांगली शाखेचा आज प्रारंभ

**सांगली / प्रतिनिधी**

मुगळी (ता. गडहिंग्लज) येथील एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या एम. एल. चौगुले यांनी मध्यमवर्गीयांना हक्काचं घरकुल साकारण्यासाठी सुलभ अर्थसहाय्य करण्याच्या उद्देशाने श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीची स्थापन केली. दोन दशकांच्या यशस्वी वाटचालीत संस्थेकडे ३७१ कोटींच्या ठेवी आहेत. निवारा चळवळीसाठी





हौसिंग फायनान्स क्षेत्रात सहकारी तत्त्वावर योगदान देणारी रवळनाथ देशातील एकमेव मल्टिस्टेट संस्था आहे. २४ डिसेंबरला सांगली येथे १० व्या शाखेचा दिमाखात प्रारंभ होत आहे. १४ ऑक्टोबर, १९९६ रोजी आजरा महाविद्यालयाचे तत्कालिन वरिष्ठ लिपिक एम. एल. चौगुले यांनी डॉ. शिवशंकर उपासे, प्रा. डॉ. आर. एस. निळपणकर व सहकाऱ्यांच्या मदतीने केवळ १८ सभासद व १० हजार भाग भांडवलावर संस्थेची स्थापना केली. आत्ताची सांगली शाखा स्वमालकीच्या इमारतीत आहेत. एकूण १३७ कोटीची गुंतवणूक असून वार्षिक व्यवसाय तब्बल ६२४ कोटीचा आहे. ३१ मार्च २०२२ अखेर संस्थेला १ कोटी ८८ लाखाचा नफा झाला असून, सभासदांना ९ टक्के लाभांश दिला आहे. गडहिंग्लज येथे संस्थेचे सुसज्ज प्रधान कार्यालय असून सध्या आजरा, गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगाव, निपाणी कुडाळ व सांगली अशा १० शाखा आहेत.

Smart Sangli Edition
Dec 23, 2022 Page No. 02
Powered by : eReleGo.com